महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव

GOVERNMENT MEDICAL COLLEGE AND HOSPITAL, DHARASHIV

कोविड-१९ इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) ४१३ ५०१

e-mail: deangmcosmanabad@gmail.com

जा.क्र. शावैमवरुधा/औषधी व सर्जिकल भांडार/ १४० /२०२४ दि.०१/०२/२०२४

## -: जाहिर नोटीस :-

विषय :- सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव करीता आवश्यक औषधी व सर्जिकल साहित्याच्या स्थानिक खरेदीकरीता ई-दरपत्रके सादर करण्याकरीता दि.०५.०१.२०२४ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ :- १. उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखसं- २०१४/ प्र.क्र.८२/ भाग-३/उद्योग-४, मंत्रालय, मुंबई, दि.०१.१२.२०१६ रोजीचे शासन निर्णय.

२. उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- २०२१/ प्र.क्र.८/ उद्योग-४, दि.०७.०५.२०२१ रोजीचा शासन निर्णय.

३. या कार्यालयाचे कार्यालयीन क्र. शावैमवरुधा/औषधी व सर्जिकल भांडार/१६१/२०२४, दि.२९.०१.२०२४ रोजीचे कार्यालयीन आदेश.

औषधी व सर्जिकल साहित्य पुरवठादारांस कळविण्यात येते की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुगणालय, धाराशिव करीता औषधी व सर्जिकल साहित्य खरेदी करावयाचे आहे. करीता इच्छुक पुरवठादारांनी आपले ई- दरपत्रके दि.३१.०१.२०२४ पर्यंत सादर करण्याविषयी कळविण्यात आलेले होते. परंतु अद्याप एकही पुरवठादाराने या कार्यालयास ई दरपत्रके प्राप्त झालेले नाही. त्यामुळे उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये मागविण्यात आलेल्या पत्रास दि.०५.०१.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

बंद लिफाफ्यात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन सदर जाहिर सुचना ही सुचना फलक व संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्याची यादी खालीलप्रमाणे :- (संदर्भ क्र. ३ मधील बाबींची यादी)

**अटि व शर्ती :-**

१. ई-दरपत्रके दि.०५/०१/२०२४ वाजेपर्यंत सिलबंद लिफाफ्यामध्ये या कार्यालयाच्या आवक विभागामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये स्विकारण्यात येतील व वेळेत न आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

२. प्राप्त दरपत्रके दि.०६/०१/२०२४ रोजी ठिक ११:३० वाजता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे उघडण्यात येवुन पुरवठाधारकांनी दिलेले किमान दर मान्य करुन तदनंतर किमान दर

असणाऱ्या पुरवठाधारकास रुग्णालयाच्या आवश्यकतेप्रमाणेच औषधी व सर्जिकल साहित्याचे पुरवठा आदेश देण्यात येतील.

३. रुग्णांच्या गरजेनुसार खरेदी (Emergency local purchase) करण्यात येत असल्याने जीवरक्षक व जीवनावश्यक औषधी व सर्जिकल साहित्याचे या कार्यालयाकडुन पुरवठा आदेश दिल्यानंतर एकुण पुरवठा आदेशाच्या कमीत कमी २५ टक्के औषधी व सर्जिकल साहित्याचा पुरवठा चोवीस तासाच्या आत औषधी भांडार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे पुरवठाधारकांनी स्वत: करावा व उर्वरीत शिल्लक साठा व यादीमधील इतर सर्व औषधी व सर्जिकल साहित्याचा पुरवठा तीन दिवसाच्या विहित मुदतीमध्ये औषधी भांडार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे पुरवठाधारकांनी स्वत: करणे आवश्यक आहे. विहीत मुदतीत औषधी व सर्जिकल साहित्याचा पुरावठा या कार्यालयास प्राप्त न झाल्यास एल २ पुरवठादाराकडुन किंवा स्थानिक बाजरातुन आवश्यकतेनुसार औषधी व सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात येईल. एल २ पुरवठादाराकडुन किंवा स्थानिक बाजारातुन खरेदी केलेल्या ओषधी व सर्जिकल साहित्याची खरेदी किंमत एल १ पुरवठादारापेक्षा जास्त असल्यास सदरील फरकाची रक्कम एल १ पुरवठादाराकडुन वसुल करण्यात येईल.

४. दोन किंवा दोन पेक्षा अधिक पुरवठादारांनी दिलेले दर सर्वात कमी व समान असतील तर सर्वात कमी व समान दर असणाऱ्या विभागुन पुरवठा आदेश देण्यात येतील.

५. पुरवठाधारकाने दरपत्रकासोबत, दुकान परवाना, औषधी परवाना, मुळे संस्थेचे किंवा पुरवठादाराचे पॅनकार्ड, वस्तु व सेवा कर नोंदणी प्रत किंवा लागु नसल्यास त्याबाबतचे घोषणापत्र, संस्थेचे बॅंक खाते बाबतचा पुरावा इ. कागदपत्रे जोडावीत. पुरवठाधारकानी दोन वेगवेगळे बंद लिफाफे सादर करुन एका लिफाफ्यात दरपत्रके व एका लिफाफ्यात फर्मबाबतची कागदपत्रे जोडावीत.

६. एका पुरावठादारास एकच दरपत्रक सादर करण्याची परवानगी असले. औषधी व सर्जिकल साहित्याचा देण्यात येणाऱ्या दरपत्रकामध्ये औषधी व सर्जिकल साहित्याची मुळ किंमत व लागु असलेले कर (जी एस टी) दर्शविण्यात यावे.

७. देयकावर वस्तु व सेवा नंबर असणे आवश्यक आहे. वस्तु व सेवा कराशिवाय देयक स्विकारले जाणार नाहीत. आपण सादर केलेल्या मुळ दर व वस्तु व सेवा कराशिवाय इतर कोणत्याही प्रकारचे आगावु खर्च (वाहतुक भाडे/हमाली/डिलीव्हरीने पोहच चे शुल्क) अदा करण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

८. औषधी व सर्जिकल साहित्याचा पुरवठा वाहतुकी दरम्यान तुट फुट/खराब झाल्यास विना विलंब बदलुन देणे बंधनकारक राहील.

९. तसेच सदरील औषधी व सर्जिकल साहित्याची देयके वरीष्ठ कार्यालयाकडुन जसे अनुदान प्राप्त होईल त्याप्रमाणे अदा करण्यात येईल.

१०. पुरवठाधारकांनी पुरावठा केलेली औषधी व सर्जिकल साहित्य अप्रमाणित असल्यास या कार्यालयाने मान्य केलेल्या दरानुसारच विनाविलंब बलदुन देणे बंधनकारक राहील.

११. कोणतेही कारण न देता प्राप्त दरपत्रकापैकी कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा अथवा फेटाळण्याचा व दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवला आहे

१२. यादीमधील सर्व औषधी व सर्जिकल साहित्य दर्शविलेल्या संख्येनुसार खरेदी करणे बंधनकारक राहणार नाही.

१३. सदरील दरपत्रके हे मंजूर दिनांकापासून पुढील ६ महिन्याच्या कालावधीकरीता वैध राहतील.

१४.प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास व्याज देय राहणार नाही.

१५.देयके सादर करताना लिफाफ सीलबंद करुन सादर करावेत.

१६.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव हे कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर पुरवठादार निवडप्रक्रिया थांबविण्याचा किंवा रदद करण्याचा अधिकार राखून ठेवत आहेत.

(डॉ.शिल्पा दोमकुंडवार)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
धाराशिव

प्रत :-

१. संकेतस्थळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव.
२. सुचना फलक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव.
३. नितीन फार्मा अण्ड सर्जिकल, धाराशिव.
४. जया इन्टरप्रायझेस, लातुर.
५. विशाल इन्टरप्रायझेस, कोल्हापुर.
६. भवानी एजन्सी, धाराशिव.
७. भक्ती एजन्सी, धाराशिव.
८. गांधी मेडीकल, धाराशिव.
९. इतर इच्छुक पुरवठादार